# व्याकरण विवेचन

## १) विध्यर्थकाचे प्रत्यय आणि क्रियापदाची रूपे

१) हे करावे, हे केले पाहिजे, कर्तव्याचा उपदेश यासाठी विध्यर्थक क्रियापदांचा उपयोग केला जातो.
२) एखादे काम करण्यासाठी प्रेरणा, इच्छा, काही वेळा नकार दर्शवण्यासाठी विध्यर्थक क्रियापदांचा उपयोग केला जातो.
३) शंका किंवा शक्यता दर्शवण्यासाठी सुद्धा विध्यर्थक क्रियापदांचा उपयोग केला जातो.

**प्रत्यय**

| पुरुष | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथम पुरुष | एज्जा, एज्जामि | एज्जाम |
| द्वितीय पुरुष | एज्जा, एज्जासि, एज्जाहि | एज्जाह |
| तृतीय पुरुष | ए, एज्जा | एज्जा |

**रूपे**

**'पास' – पाहणे**

| पुरुष | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथम पुरुष | पासेज्जा, पासेज्जामि | पासेज्जाम |
| द्वितीय पुरुष | पासेज्जा, पासेज्जासि, पासेज्जाहि | पासेज्जाह |
| तृतीय पुरुष | पासे, पासेज्जा | पासेज्जा |

**'गा' – गाणे**

| पुरुष | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथम पुरुष | गाएज्जा, गाएज्जामि | गाएज्जाम |
| द्वितीय पुरुष | गाएज्जा, गाएज्जासि, गाएज्जाहि | गाएज्जाह |
| तृतीय पुरुष | गाए, गाएज्जा | गाएज्जा |

**'णे' – नेणे**

| पुरुष | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथम पुरुष | णेज्जामि | णेज्जाम |
| द्वितीय पुरुष | णेज्जासि | णेज्जाह |
| तृतीय पुरुष | णेज्जा | णेज्जा |

**'हो' – असणे**

| पुरुष | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथम पुरुष | होज्जा, होज्जामि | होज्जाम |
| द्वितीय पुरुष | होज्जा, होज्जासि, होज्जाहि | होज्जाह |
| तृतीय पुरुष | होज्जा | होज्जा |

**विकरणासहित हो धातूची रूपे –**

| पुरुष | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथम पुरुष | होइज्जामि, होएज्जामि | होइज्जाम, होएज्जाम |
| द्वितीय पुरुष | होइज्जासि, होएज्जासि, होइज्जाहि, होएज्जाहि | होइज्जाह, होएज्जाह |
| तृतीय पुरुष | होइज्जा, होएज्जा | होइज्जा, होएज्जा |

## सर्वनामे

दर्शक, संबंधदर्शक व प्रश्नार्थक या तीनही सर्वनामांची पुल्लिंगी व स्त्रीलिंगी रूपे इयत्ता अकरावी मध्ये आपण शिकलो आहोत. आता त्याच सर्वनामांची नपुंसकलिंगी रूपे पाहू.

दर्शक सर्वनामे– १) एय (एतद्) २) इम (इदम्) ३) अमु (अदस्)

### एय (एतद्) नपुं.

| कारक | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| कर्ता (प्र.) | एयं, एअं, एस, इणं, इणामो | एआइं, एयाइं, एयाणि, एआइँ, एयाइ |
| कर्म (द्वि.) | एयं | एआइं, एयाइं, एयाणि, एआइँ, एयाइ |
| करण (तृ.) | एएण, एएणं | एएहि, एएहिं |
| संप्रदान (च./ष.) | एअस्स, से | एएसिं, एआण, एयाणं |
| अपादान (पं.) | एआओ, एअत्तो | एएहिन्तो |
| संबंध (ष.) | एअस्स, से | एएसिं, एआण, एयाणं |
| अधिकरण (स.) | एअंसि, एयंसि, एयम्मि | एएसु, एएसुं |

### इम (इदम्) नपुं.

| कारक | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| कर्ता (प्र.) | इमं, इदं, इणं | इमाइं, इमाणि |
| कर्म (द्वि.) | इमं, इदं, इणं | इमाइं, इमाणि |
| करण (तृ.) | इमेण, इमेणं, इमिणा, णेण | इमेहि, इमेहिं |
| संप्रदान (च./ष.) | इमस्स, अस्स, से | इमेसिं, एसिं |
| अपादान (पं.) | इमाओ, इमत्तो | इमेहिंतो |
| संबंध (ष.) | इमस्स, अस्स, से | इमेसिं, एसिं, इमाण, इमाणं |
| अधिकरण (स.) | इमंसि, अस्सिं | इमेसुं, इमेसु |

### अमु (अदस्) नपुं.

| कारक | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| कर्ता (प्र.) | अह, अमुं | अमूइं, अमूइँ, अमूणि |
| कर्म (द्वि.) | अमुं | अमूइं, अमूइँ, अमूणि |
| करण (तृ.) | अमुणा | अमूहि, अमूहिं, अमूहिँ |
| संप्रदान (च./ष.) | अमुणो, अमुस्स | अमूण, अमूणं |
| अपादान (पं.) | अमुणो, अमुत्तो, अमूओ | अमुत्तो, अमूओ, अमूउ, |

| | | |
|---|---|---|
| | अमूउ, अमूहिन्तो | अमूहिंतो, अमूसुंतो |
| संबंध (ष.) | अमुणो, अमुस्स | अमूण, अमूणं |
| अधिकरण (स.) | अयम्मि, इअम्मि, अमुम्मि | अमूसु, अमुसुं |

('साहु' या उकारान्त पुल्लिंगी नामाप्रमाणे पुल्लिंगी 'अमु'ची रूपे होतात)

## संबंधदर्शक सर्वनाम
### ज (यद्) नपुं.

| कारक | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| कर्ता (प्र.) | जं | जाइं, जाणि |
| कर्म (द्वि.) | जं | जाइं, जाणि |
| करण (तृ.) | जेण, जेणं | जेहिं, जेहि |
| संप्रदान (च./ष.) | जस्स | जेसिं, जाण, जाणं |
| अपादान (पं.) | जाओ, जत्तो, जा, जम्हा | जेहिंतो, जेसुंतो |
| संबंध (ष.) | जस्स | जेसिं, जाण, जाणं |
| अधिकरण (स.) | जंसि, जम्मि | जेसुं, जेसु |

## प्रश्नार्थक सर्वनाम
### क (किं) न. पुं.

| कारक | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| कर्ता (प्र.) | किं | काइं, काणि |
| कर्म (द्वि.) | किं | काइं, काणि |
| करण (तृ.) | केण, केणं | केहि, केहिं |
| संप्रदान (च./ष.) | कस्स | केसिं, काण, काणं |
| अपादान (पं.) | काओ, कत्तो, कम्हा | केहिंतो, कासुंतो, केसुंतो, काहिंतो |
| संबंध (ष.) | कस्स | केसिं, काण, काणं |
| अधिकरण (स.) | कंसि, कस्सिं, कम्मि<br>कत्थ, कहिं | केसु, केसुं |

## तृतीयपुरुषी सर्वनाम
### स (तद्) तो, ती, ते
### स (तद्) पुं.

| कारक | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| कर्ता (प्र.) | सो, से, स | ते |
| कर्म (द्वि.) | तं | ते, ता |
| करण (तृ.) | तेण, तेणं | तेहि, तेहिं |
| संप्रदान (च./ष.) | तस्स | तेसिं, ताण, ताणं |
| अपादान (पं.) | ताओ, ता, तम्हा | तेहिंतो, ताहिंतो, तेसुंतो |
| संबंध (ष.) | तस्स | तेसिं, ताण, ताणं |
| अधिकरण (स.) | तंसि, तम्मि | तेसु, तेसुं |

### सा (तद्) स्त्री.

| कारक | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| कर्ता (प्र.) | सा | ताओ, तीओ |
| कर्म (द्वि.) | तं | ताओ, तीओ |
| करण (तृ.) | ताए, तीए | ताहिं |
| संप्रदान (च./ष.) | ताए, तीए, तीसे | ताणं, ताण |
| अपादान (पं.) | ताओ | ताहिंतो, तासुंतो, ताओ |
| संबंध (ष.) | ताए, तीए, तीसे | ताणं, ताण |
| अधिकरण (स.) | तीए, तीसे | तासुं, तासु |

### स (तद्) नपुं.

| कारक | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| कर्ता (प्र.) | तं | ताइं, ताणि |
| कर्म (द्वि.) | तं | ताइं, ताणि |
| करण (तृ.) | तेण, तेणं | तेहिं, तेहि |
| संप्रदान (च./ष.) | तस्स | तेसिं, ताणं, ताण |
| अपादान (पं.) | ताओ | तेहिंतो, तासुंतो, ताओ |
| संबंध (ष.) | तस्स | तेसिं, ताण, ताणं |
| अधिकरण (स.) | तंसि, तम्मि | तेसुं, तेसु |

## २) क्रियापदांची कर्मणी रूपे व प्रयोग

कर्मणी प्रयोगामध्ये धातूचे कर्मणी रूप वापरतात. सर्व वर्गातील धातूंना 'इज्ज' प्रत्यय लावून कर्मणी रूपे तयार करतात. मूळ धातूंना इज्ज प्रत्यय लागल्यावर तयार होणाऱ्या रूपाला 'कर्मणी अंग' म्हणतात.

उदा. पास + इज्ज = पासिज्ज      गच्छ + इज्ज = गच्छिज्ज

गा + इज्ज = गाइज्ज      णे + इज्ज = णेइज्ज      हो + इज्ज = होइज्ज

ह्या कर्मणी अंगाला काळाचे किंवा अर्थाचे प्रत्यय लावतात. जसे – वर्तमानकाळी (वंदिज्जामि), भूतकाळी (वंदिज्जित्था), भविष्यकाळी (वंदिज्जिस्सामि), आज्ञार्थी (वंदिज्जामु), विध्यर्थी (वंदिज्जिज्जामि) अशी रूपे होतात.

सर्व कर्मणी अंगे अकारांत असल्यामुळे ती पहिल्या प्रकारातील 'पास' धातूप्रमाणे चालतात.

| | **पास – कर्मणी वर्तमानकाळ** | | **णे – कर्मणी वर्तमानकाळ** | |
|---|---|---|---|---|
| | एकवचन | अनेकवचन | एकवचन | अनेकवचन |
| प्र.पु. | पासिज्जामि | पासिज्जामो | णेइज्जामि | णेइज्जामो |
| द्वि.पु. | पासिज्जसि | पासिज्जह | णेइज्जसि | णेइज्जह |
| तृ.पु. | पासिज्जइ | पासिज्जंति | णेइज्जइ | णेइज्जंति |

महाराष्ट्री प्राकृतमध्ये काही कर्मणी अंगे (रूपे) संस्कृतमधून आली असून त्यांना सिद्ध रूपे म्हटले जाते. त्यांना अनियमित कर्मणी अंगे (रूपे) म्हणतात. उदा. –

| | | |
|---|---|---|
| कर – कीर, किज्ज (कीरइ / किज्जइ) | पा – पिज्ज (पिज्जइ) | दे – दिज्ज (दिज्जइ) |
| पास – पासिज्ज/दीस (पासिज्जइ/दीसइ) | णे – णिज्ज (णिज्जइ) | लह – लब्भ (लब्भइ) |
| सुण – सुव्व, सुम्म (सुव्वइ/सुम्मइ) | भण – भण्ण (भण्णइ) | जाण – णज्ज (णज्जइ) |
| हण – हम्म (हम्मइ) | तर – तीर (तीरइ) | वय – वुच्च (वुच्चइ) |
| बंध – बज्झ (बज्झइ) | मुंच – मुच्च (मुच्चइ) | खा – खज्ज (खज्जइ) |
| डह – डज्झ (डज्झइ) | णट्ट – णच्च (णच्चइ) | थुण – थुव्व (थुव्वइ) |

## २.१ प्रयोग विचार

मराठी व संस्कृतप्रमाणे महाराष्ट्री प्राकृतमध्ये तीन प्रयोग आहेत. – (१) कर्तरी, (२) कर्मणी व (३) भावे.

**कर्तरी प्रयोग –** या प्रयोगात कर्ता प्रथमेत, कर्म द्वितीयेत व क्रियापद कर्त्याप्रमाणे असते. वाक्यात कर्म असल्यास त्याला सकर्मक कर्तरी प्रयोग म्हणतात.

**उदा. णरिंदो रज्जं पालेइ।** **मेहा जलं वरिसंति।**

**सीया रामं पेक्खइ।** **चेडा भारं गेण्हंति।**

**अहं विउलं धणं लहिस्सामि।**

वाक्यात कर्म नसल्यास त्याला अकर्मक कर्तरी प्रयोग म्हणतात.

**उदा. सा हसिऊण उवविसइ। णट्टियाओ णच्चंति। किंकरो गाढं पसुत्तो। चोरा आगच्छंति।**

क्रियापद सकर्मक असून सुद्धा कर्म अध्याहृत असते त्याला ‘अध्याहृत-कर्म कर्तरी प्रयोग’ म्हणतात.

**उदा. रामो भक्खइ। णिवो भणइ। रावणो पासइ।**

**कर्मणी प्रयोग –** कर्मणी प्रयोगात कर्ता तृतीयेत, कर्म प्रथमेत व क्रियापद कर्माप्रमाणे असते.

**उदा. णरिंदेण रज्जं पालिज्जइ। मए धणं लहिज्जिस्सइ। समणेण धम्मो सुणिज्जइ।**

**भावे प्रयोग –** भावे प्रयोगात कर्ता तृतीयेत व क्रियापद नेहमी तृतीय पुरुषी एकवचनी असते. भावे प्रयोगाचा क्वचितच वापर केला जातो.

**उदा. देवयाए हसिज्जइ।** **चोरेहिं आगच्छिज्जइ।**

कर्म अध्याहृत असेल तर ‘रामेण भक्खिज्जइ।’ असे वरील प्रमाणेच बदल होतील.

**प्रयोग खालीलप्रमाणे बदलता येतात.**

| **सकर्मक कर्तरी** | **कर्मणी** |
|---|---|
| समणो मोक्खं लहइ। | समणेण मोक्खो लब्भइ। (लहिज्जइ) |
| मेहा जलं वरिसंतु। | मेहेहिं जलं वरिसिज्जउ। |
| रावणो तवं करेइ। | रावणेण तवो कीरइ। |
| अहं मउडं देमि। | मए मउडो दिज्जइ। |
| अणगारो सच्चं जंपेज्जा। | अणगारेण सच्चं जंपिज्जिज्जा। |
| **अध्याहृत-कर्म कर्तरी** | **अध्याहृत-कर्म भावे** |
| रामो भक्खइ। | रामेण भक्खिज्जइ। |
| अमच्चा भणंति। | अमच्चेहिं भणिज्जइ। |
| णिवो जाणिस्सइ। | णिवेण जाणिज्जिस्सइ। |

कर्मणी व भावे प्रयोगाचा कर्तरी प्रयोग करताना नियम उलट लावावेत (म्हणजेच कर्ता प्रथमेत, कर्म द्वितीयेत

व क्रियापद कर्त्याप्रमाणे करावे) मात्र कर्मणी प्रयोगात कर्मणी भूतकाळवाचक धातुसाधित विशेषण (कर्मणी भू.धा. वि.) अगर कर्मणी विध्यर्थक धातुसाधित विशेषण (कर्म.विध्य.धा.वि.) वापरले असल्यास त्याबद्दल अनुक्रमे कर्तरी भूतकाळवाचक धातुसाधित विशेषण (कर्त.भू.धा.वि.) व विध्यर्थ योजावे.

उदा. –

| कर्मणी प्रयोग | कर्तरी प्रयोग |
|---|---|
| वग्घेण वाणरो हओ। | वग्घो वाणरं हयवंतो। (हणित्था) |
| सियालेण मओ हत्थी दिट्ठो। | सियालो मयं हत्थिं दिट्ठवंतो। (पासित्था) |
| समणेहिं धम्मो कहिअव्वो। | समणा धम्मं कहेज्जा। |
| णिवेण पआ पालिअव्वा। | णिवो पअं पालेज्जा। |

**कर्मणी अंगाचा उपयोग ज्यामध्ये झाला आहे. अशा काही गाथांचे उदाहरण**

**खंडिज्जइ** विहिणा ससहरो वि सूरस्स होइ अत्थमणं ।
हा दिव्व-परिणइए **कवलिज्जइ** को ण कालेण ।।
मणहरवण्णं पि हु कण्णियार-कुसुमं ण एइ भमराली ।
रूवेण किं व **कीरइ** गुणेण छेया **हरिज्जंति** ।।
हद्धी ! कह ण **मरिज्जइ** मरालललीला विलासगोज्जाए ।
तवणलिणीए **खंडेइ** वायसो जत्थ अहरदलं ।।
णिद्दं च्चिय **वंदिज्जइ** किं **कीरइ** देवयाहिं अण्णाहिं ।
जीए पसाएण पिओ **दीसइ** दूरे वि णिवसंतो ।।
गुणसंगेण वि गुरुया जयम्मि सव्वत्थ होंति गारविया ।
ठाणभट्ठं भट्ठं **वंदिज्जइ** चंदणं, उयह ।।

## २.२ धातुसाधिते

- **'च्वि'रूप–**

अगोदर अस्तित्वात नसलेली एखादी गोष्ट 'अस्तित्वात येणे' किंवा 'आणणे' असा अर्थ असताना वाक्यात 'च्वि'रूप वापरतात. तसेच जे नाही ते करणे किंवा तसे होणे असा अर्थ देखील या रूपांमधून व्यक्त होतो. नाम किंवा विशेषणे यांना कृ(कर) व भू/हू (भव/हव) या धातूंची रूपे जोडून 'च्वि'रूप तयार केले जाते. त्याचप्रमाणे धातुसाधित विशेषण वापरूनही 'च्वि'रूपे तयार केली जातात. उदा. –

**वसीकरेमि –** 'कर' 'च्वि'रूप, वर्तमानकाळ प्रथम पुरुष एकवचन
**वसीकरेइ –** 'कर' 'च्वि'रूप, वर्तमानकाळ तृतीय पुरुष एकवचन
**विरलीहूआ –** 'भू-हू''च्वि'रूप, कर्मणी भूतकालवाचक धातुसाधित विशेषण
**लक्खीकआ –** 'कर' 'च्वि'रूप, कर्मणी भूतकाळवाचक धातुसाधित विशेषण
**किंकिरीकआ –** 'कर' 'च्वि'रूप, कर्मणी भूतकाळवाचक धातुसाधित विशेषण.

- **कर्मणी भूतकालवाचक धातुसाधित विशेषणे (कर्म.भू.धा.वि.)–**

कर्मणी भूतकालवाचक धातुसाधित विशेषणांद्वारे भूतकाळी अर्थ सांगितला जातो. विशेषण आणि क्रियापद अशा दोनही अर्थी ही विशेषणे वापरली जातात. महाराष्ट्री प्राकृत भाषेमध्ये भूतकालवाचक विशेषणांसाठी मुख्यत्वे **इअ/इय** हा प्रत्यय वापरला जातो. पण य आणि क्त=त हे प्रत्यय देखील वापरले जातात. शिवाय प्रयोजक भूतकालवाचक

विशेषणे देखील वापरलेली दिसून येतात. त्याची पुल्लिंगी रूपे पुढीलप्रमाणे -

**१) इअ/इय -** गम - गमिओ / गच्छिओ | हस - हसिओ | चिंत - चिंतिआ (ब.व.)
वल - वलिओ | वर - वरिओ | फुर - फुरिओ
णिवेस- णिवेसिओ | चल - चलिओ | कर - करिओ

**२) संस्कृतमध्ये क्त प्रत्यय लागून कर्म.भू.धा.वि. होते. त्या रूपांना 'सिद्ध रूपे' म्हणतात. ही रूपे वर्णविकाराने जशीच्या तशी महाराष्ट्री प्राकृत मध्ये वापरली जातात.**

जात: = जाओ/जातो | अवनत: = ओणओ/ओणतो | आगत: = आगओ
प्रणत: = पणओ | समागत: = समागओ | संजात: = संजाओ

**३) क्त प्रत्ययाशिवाय संस्कृतमध्ये सिद्ध असणारी रूपे महाराष्ट्री प्राकृतमध्ये वर्णविकाराने येतात.**

उक्तं = वुत्तं | प्रवृत्तः = पयट्टो | मृतं = मडं
कृतं = कडं | दृष्टः = दिट्ठो | तुष्टा = तुट्ठा

**४) प्रयोजक -** हस - हसाविओ / हासिओ | कर - कराविओ /कारिओ
पढ - पढाविओ / पाढिओ | पास - पासाविओ

- **कर्तरी व कर्मणी वर्तमानकालवाचक धातुसाधित विशेषणे (कर्त/कर्म. व. का. धा. वि.)-**

एखादी क्रिया करत असताना अन्य क्रिया दाखवण्यासाठी व.का.धा. विशेषणांचा वापर केला जातो. त्यासाठी **अंत** व **माण** हे दोन प्रत्यय वापरले जातात. कर्तरी विशेषणे तयार करताना हे प्रत्यय प्रत्यक्ष धातूला लावले जातात. पण कर्मणी विशेषणे तयार करताना धातूचे प्रथम कर्मणी रूप तयार करून घ्यावे लागते. वर्तमानकालवाचक अर्थ या विशेषणाने सांगितला जातो. प्राकृत साहित्यात या विशेषणांचा भरपूर वापर केलेला दिसतो. विशेषणे कर्त्याच्या लिंग, वचन, विभक्तीप्रमाणे चालतात.

**१) कर्तरी विशेषणे -**

कीर - कीर + अंत - कीरंत = कीरंतो | पहर - पहर + अंत - पहरंत = पहरंतो
कील - कील + अंत - कीलंत = कीलंतो | पड - पड + अंत - पडंत = पडंतो
गच्छ - गच्छ + माण- गच्छमाण = गच्छमाणा | कह - कह + माण - कहमाण = कहमाणा
कड्ढ - कड्ढ + माण- कड्ढमाण = कड्ढमाणं | विहर - विहर + माण - विहरमाण = विहरमाणं

**२) कर्मणी विशेषणे -**

गा - गाइज्ज = गाइज्जंतो | ताड - ताडिज्ज = ताडिज्जंतो
पढ - पढिज्ज = पढिज्जंतो | हस - हसिज्ज = हसिज्जमाणा
कर = करिज्ज/कीर = करिज्जमाणा/कीरमाणा

- **कर्मणी विध्यर्थक धातुसाधित विशेषण -**

हे करावे, हे केले पाहिजे, हे करण्यास योग्य आहे असा अर्थ कर्म. विध्य. धा. विशेषणांमधून सांगितला जातो. संस्कृतमध्ये या विशेषणांसाठी य, तव्य आणि अनीय हे प्रत्यय वापरले जातात. महाराष्ट्री प्राकृतमध्ये णिज्ज, इयव्व/इअव्व आणि यव्व/अव्व हे प्रत्यय वापरले जातात. अकारांत धातूंना णिज्ज आणि इयव्व/इअव्व हे प्रत्यय लागतात. आ, ए व ओकारांत धातूंना यव्व/अव्व प्रत्यय लागतो. त्याची रूपे पुढीलप्रमाणे -

परि + हर + इयव्व = परिहरियव्व/परिहरिअव्व | दट्ठ + यव्व = दट्ठव्व

पूय + णिज्ज = पूयणिज्ज/पूअणिज्ज

ज्ञा = जा + इयव्व = जाणियव्व/जाणिअव्व

सिक्ख + आव + इयव्व = सिक्खावियव्व (प्रयोजक)

चिंत + इयव्व = चिंतियव्व/चिंतिअव्व

हो + यव्व = होयव्व/होअव्व

हस + आव + इयव्व = हसावियव्व

## अभ्यास

**१. मराठीत भाषांतर करा –**

१) चंदो धवलिज्जइ पुण्णिमाए ।

२) ण णज्जइ भीसणे वणे किं हवइ।

**२. प्रयोग ओळखून नाव लिहा –**

१) एक्ककुसुमंसि बे तिण्णि गुणा ण लब्भंति।

२) जूए पराइया पंडवा वणं गच्छिंसु।

३) तओ रण्णा भणियं।

**३. प्रयोग बदला –**

१) महावीरो णिवेहिं वि वंदिज्जइ।

२) वग्घो सीहं दिट्ठवंतो।

३) चोरो वत्थाणि हरइ।

४) देवी आगच्छइ।

**४. पुढील सुभाषितांचे मराठीत भाषांतर करा –**

१) जंपिज्जइ पियवयणं किज्जइ विणओ, दिज्जइ दाणं।
परगुणगहणं किज्जइ आमूलमंतं वसीकरणं ।।

२) कोवि ण अब्भत्थिज्जइ, किज्जइ कस्स वि ण पत्थणाभंगो।
दिण्णं च ण जंपिज्जइ, जीविज्जइ जाव इहलोए।।

३) अभिहाणमभणंती वि हु होइ पयडो गुणेहिं सप्पुरिसो।
छिण्णो वि चंदणतरू किं ण कहिज्जइ परिमलेणं।।

**५. पुढील वाक्यात गाळलेले शब्द भरा –**

(कायव्वो, खमीयउ, दिज्जउ, थुव्वइ, कवलिज्जइ)

१) राया बंदिजणेण .......।

२) ण उण ..... पमाओ।

३) ..... को ण कालेण ?

४) देव, मम एस अवराहो ......।

५) ताय, ...... रज्जं महापउमस्स।

## ३) प्रयोजक विचार

एखादी क्रिया आपण स्वतः न करता, जेव्हा दुसऱ्याकडून करवून घेतो, त्यावेळी धातूचे प्रयोजक रूप वापरतात.

**उदा. –**

**राया परिणेइ।** (राजा विवाह करतो)

**राया अभयकुमारं परिणावेइ।** (राजा अभयकुमाराला लग्न करायला लावतो)

मराठीतही सामान्यतः ‘वि’ प्रत्यय लावून प्रयोजके बनवितात. उदा. करणे – करविणे, हसणे – हसविणे, रडणे– रडविणे. महाराष्ट्री प्राकृतमध्येसुद्धा मूळ धातूला प्रत्यय लावून प्रयोजक धातू तयार करतात.

## ३.१ प्रयोजकाचे प्रत्यय

**१) अकारान्त धातूंना 'आवे' प्रत्यय लावतात.**

उदा. पास – पास+आवे – पासावे = पासावेइ, कर – करावे = करावेइ, गच्छ – गच्छावे = गच्छावेइ.

**२) आकारान्त धातूंना 'वे' प्रत्यय लावतात.**

उदा. गा – गावे = गावेइ, ठा – ठावे = ठावेइ, ण्हा – ण्हावे = ण्हावेइ.

**३) एकारान्त व ओकारान्त धातूंना 'आवे' हा प्रत्यय लागताना 'आ' चा 'या' होतो व 'यावे' असा प्रत्यय तयार होतो.**

उदा. णे – णेयावे = णेयावेइ, बे – बेयाव = बेयावेइ, हो – होयावे = होयावेइ.

**४) काही विशिष्ट धातूंना 'ए' प्रत्यय लावून व उपांत्य स्वर ऱ्हस्व असल्यास दीर्घ करून प्रयोजक बनवितात.**

उदा. मर–मारे = मारेइ, कर–कारे = कारेइ, पड–पाडे = पाडेइ, लभ–लाभे = लाभेइ.

## ३.२ काही अनियमित प्रयोजके

ठा(स्था) ठावे, दक्ख(दृश्) दरिसे, दक्खावे, पव्वय(प्र+व्रज्) पव्वावे, भम(भ्रम) भमावे, विण्णव(वि+ज्ञा) विण्णवे, णास(नश्) णासे, णासवे.

प्रयोजके सुद्धा क्रियापदेच असल्यामुळे ती सर्व काळात चालतात व इतर धातुसाधित रूपेही तयार होतात.

सर्व प्रयोजक क्रियापदे एकारांत असल्यामुळे ती दुसऱ्या वर्गातील 'कर' धातूप्रमाणे चालतात.

उदा. पासावेमि, पासावेत्था, पासाविस्सइ, पासावेमु, पासावेज्जा, पासावेऊण, पासावेउं.

### अभ्यास

**१. अकारांत व एकारांत धातूंना प्रयोजकांचे जे प्रत्यय जोडले जातात ते सांगा.**

**२. प्रयोजक वाक्ये तयार करा.**

१) णिवो हसइ।

२) किंकरो भारं णेइ।

३) माया भुंजइ।

४) पुरिसो कम्मं करेइ।

५) बालो पडइ।

६) पिआ हसइ।

**३. भाषांतर करा.**

१) अहं हिंसं ण करेमि, ण अ करावेमि।

२) कणयमंजरी पढमं जणअं भुंजावेइ।

३) तवस्सी ण छिंदे, ण छिंदावए, ण पए, ण पयावए। (पय-(पच्)शिजवणे)

४) समणा अदिण्णं ण गेण्हंति, परं ण गेण्हावेंति ।

५) माणवो हिंसगं मुसं च ण वएज्जा, ण अण्णं वयावेज्जा (मुसा – खोटे, वय – बोलणे)

## ४) तर–तम–भाव दर्शक विशेषणे

महाराष्ट्री प्राकृतमध्ये विशेषणांना **तर** किंवा **अर/यर** हे प्रत्यय लावले असता **तर –** भाव दर्शक विशेषण बनते; **तम** किंवा **अम/यम** हे प्रत्यय लावले असता **तम –** भावदर्शक विशेषण बनते. तर– भावदर्शक विशेषणाने 'हून, पेक्षा, अधिक' असा अर्थ होतो; तम– भावदर्शक विशेषणाने 'सर्वात अधिक' असा अर्थ होतो. **उदा. –**

| विशेषण | तर–भावदर्शक | तम–भावदर्शक |
|---|---|---|
| कढिण (कठीण) | कढिणअर, कढिणयर, कढिणतर | कढिणअम, कढिणयम, कढिणतम |
| गोर (गौर) | गोरअर, गोरयर, गोरयतर | गोरअम, गोरयम, गोरतम |

सामान्यतः दोन व्यक्ती किंवा वस्तू यांमध्ये तुलना करावयाची असल्यास **तर** हे भावदर्शक विशेषण वापरतात आणि ज्यापेक्षा जास्त असे सांगायचे त्याची पंचमी विभक्ती केली जाते. तसेच दोनपेक्षा अधिक व्यक्तींमध्ये श्रेष्ठता दाखविताना **तम** हे भावदर्शक विशेषण वापरतात. **तम** प्रत्ययान्त विशेषणे ही बहुधा षष्ठी किंवा सप्तमीच्या अनेकवचनांबरोबर वापरतात.

याच विशेषणांची महाराष्ट्री प्राकृतमध्ये काही संस्कृतप्रमाणे तयार झालेली रूपे दिसून येतात.

**उदा. –** जेट्ठ (ज्येष्ठ – सर्वात मोठा), सेयं (श्रेयस्–चांगले), सेट्ठ (श्रेष्ठ – सर्वोत्तम), कणीयस (कनीयस् – धाकटा), पाविट्ठ (पापिष्ठ – अत्यंत पापी)

## अभ्यास

**१. तर–तम–भाव याचा अर्थ सांगा.**

**२. पुढील विशेषणांची तर–तम–भावदर्शक रूपे तयार करा.**

धवल, अहिअ, उत्तुंग, कसिण, कट्ठ, कणिट्ठ

**३. भाषांतर करा.**

१) कण्हेण भणिअं – 'मुंच, मुंच, मम सुट्ठुयरं/सुट्ठुअरं दुक्खं समुप्पज्जइ।'

२) जरकुमारेण चिंतिअं – 'अहो कट्ठं कट्ठयरं/कट्ठअरं' त्ति। 'कहमहं वसुदेवपुत्तो होऊण सयमेव कणीयसं भायरं विणासेहामि।'

## ५) उपसर्ग

उपसर्ग म्हणजे मूळची अव्यये. उपसर्ग धातूंच्या आधी जोडले जातात. नेहमी उपयोगात येणारे उपसर्ग त्यांच्या विशिष्ट अर्थासह खाली दिले आहेत.

| | |
|---|---|
| अइ – (अति) – पलीकडे | अइक्कम – पलीकडे जाणे |
| अणु – (अनु) – मागाहून | अणुसर – मागाहून जाणे |
| अव – (अप) – बाजूला | अवसर – बाजूला होणे |
| अव – (अव) – खाली | अवअर, अवतर – खाली उतरणे |
| वि – (वि) – विशिष्ट | विकुव्व – विशिष्ट प्रकारे करणे, बनविणे |
| णिस – (निस्) – बाहेर | णिक्खम – बाहेर जाणे |
| सम – (सम्) – समान | संगम – समान जाणे = एकत्र येणे |

उपसर्गांमुळे धातूंचा मूळ अर्थ बदलतो पण काही वेळा अर्थात फारसा फरक पडत नाही.

उदा. विसइ – पविसइ        चिंतेइ – विचिंतेइ

**काही वेळा मूळ अर्थावर जास्त जोर येतो.**

उदा.

| | |
|---|---|
| णास – नाश पावणे | विणास – पूर्ण नाश करणे |
| लस – चमकणे | विलस – विशेष चमकणे |
| राअ, राय – शोभणे | विराअ, विराय – विशेष शोभणे |
| चअ, चय – त्याग करणे | परिच्चअ, परिच्चय – सर्वस्वी त्याग करणे |

**मूळ अर्थात बदल होणारी काही उदाहरणे –**

| | |
|---|---|
| तर – तरणे | वितर – देणे |
| हर – नेणे | आहर – आणणे |
| वाहर – बोलणे | पहर – प्रहार करणे |
| विहर – क्रीडा करणे | परिहर – टाळणे |
| संहर – नाश करणे | उवसंहर – आवरणे |
| भव – असणे, होणे | अणुहव – अनुभवणे |
| गच्छ – जाणे | आगच्छ – येणे |
| अणुगच्छ – पाठोपाठ जाणे | अभिगच्छ/अहिगच्छ – सामोरे जाणे |
| अवगच्छ – जाणणे | णिग्गच्छ – बाहेर जाणे |
| उवागच्छ – जवळ जाणे | अइगच्छ – पलीकडे जाणे |
| संगच्छ – मिळून एकत्र जाणे | अहिगच्छ – मिळविणे |
| पडिगच्छ – परत जाणे | पच्चुत्तर – प्रत्युत्तर देणे |

## अभ्यास

**माध्यम भाषेत भाषांतर करा.**

१) चंपाणअरीए एगो माणुसो परिवसइ।
२) तस्स पुत्तो छगलअं आणेउं गओ।
३) राया वणे जं लहइ तं आहारेइ।
४) भो णागसेट्ठि, उवसंहरसु संरंभं, खमसु अवराहं।
५) कत्तारं एव अणुजाइ कम्मं।
६) घरमहत्तरेहिं भणिअं – 'छगलओ उवणिज्जउ'।
७) बलदेवो तत्थ सिग्घं समागओ।
८) णायदत्तो भारिआविरहेण विलवइ।
९) अम्मो णिव्विण्णकामो हं पडिणिक्खमामि।

(पडिणिक्खम – दीक्षा घेणे, णिव्विण्ण – त्रस्त, अणुजाइ – अनुसरणे, उवसंहर – आवरणे, संरंभ – क्रोध)

## ६) समास–विवेचन

**दंदो दिगुरवि चाहं, मग्गेहे णिच्चमव्वईभावो ।**
**तप्पुरिस–कम्म–धारे, होज्जं एण बहुव्वीही ।।**

दोन किंवा अधिक शब्दांतील विभक्ति–प्रत्यय गाळून तयार झालेल्या शब्दांना **समास** म्हणतात. अर्थातच समासात कमीत कमी दोन शब्द असतात. समासातील शब्दांना **पदे** म्हणतात. प्रत्येक पदाचा अर्थ स्वतंत्र असला तरी संपूर्ण सामासिक शब्दाचा अर्थ वेगळा असतो. विभक्ती प्रत्यय लावून किंवा स्वत:चे शब्द वापरून समासातील दोन पदांमधील संबंध दाखविण्याच्या क्रियेला **विग्रह करणे** असे म्हणतात. सामान्यतः नाम, विशेषण, क्रियाविशेषण, अव्यय आणि शब्दयोगी अव्यय या जातीचे शब्द समासांची पदे होऊ शकतात. समासाच्या पदांचे **प्रधानपद (मुख्यपद)** व **गौणपद** असे दोन भेद असतात. यावरून समासांचे चार मुख्य प्रकार होतात.

१) दोन्ही पदे प्रधान म्हणजेच उभयपदप्रधान – दंद (द्वन्द्व)
२) पूर्व पद गौण व उत्तर पद प्रधान – तप्पुरिस (तत्पुरुष)
३) दोन्ही पदे गौण व तिसराच एखादा अर्थ प्रधान – बहुव्वीही (बहुव्रीही)
४) पूर्व पद प्रधान, उत्तर पद गौण व सामासिक शब्द अव्यय – अव्वईभाव (अव्ययीभाव)
(पूर्व–प्रथम येणारे, उत्तर–नंतर येणारे)

### १) दंद (द्वंद्व) – (उभय पद प्रधान) –

दोन किंवा अधिक समान महत्त्वाची नामे एकत्र येऊन जो एक सामासिक शब्द तयार होतो, त्यास **द्वंद्व** असे म्हणतात. तो शब्द अनेकवचनी असून अंत्य पदाचे लिंग हेच जर संपूर्ण सामासिक शब्दाचे लिंग असेल तर त्याला **इतरेतर द्वंद्व** असे म्हणतात.

उदा. – बंभविण्हुमहेसा – बंभो अ विण्हू अ महेसो अ। (पुल्लिंगी)
जीवाजीवा – जीवा अ अजीवा अ। (पुल्लिंगी)
णरणारीओ – णरा अ णारीओ अ। (स्त्रीलिंगी)

समासातील प्रत्येक पदाला महत्त्व न देता त्या पदापासून तयार होणाऱ्या समूहाला जेव्हा महत्त्व दिलेले असते, तेव्हा त्या समासास **समाहारद्वंद्व** असे म्हणतात. समासाचा विग्रह करताना **'एआणं/एयाणं समाहारो'** असे सांगण्याची पद्धत आहे. समाहार द्वंद्व समास नेहमी नपुंसकलिंगी एकवचनात असतो.

उदा. – अण्णपाणं – अण्णं च पाणं च एआणं समाहारो ।
मंससोणियं – मंसं च सोणियं च एआणं समाहारो ।

दोन किंवा अधिक विशेषणे एकत्र येऊन झालेल्या समासास **द्वंद्व** म्हणतात.

उदा. – उच्चणीअं – उच्चं च णीअं च,
कल्लाणपावगं – कल्लाणं वा पावगं वा

काही द्वंद्व समासांचा विग्रह करताना 'वा' हे विकल्प सांगणारे उभयान्वयी अव्यय वापरले जाते.

उदा. – जयाजए – जओ वा अजओ वा।
लाभालाभे – लाभे वा अलाभे वा।

### २) तप्पुरिस (तत्पुरुष) – (उत्तर–पद–प्रधान) –

तप्पुरिस समासाचे सात पोटभेद आहेत.

#### अ) विभत्ति–तप्पुरिस

यामध्ये दुसरे (उत्तर) पद मुख्य असते. पहिल्या पदाची योग्य ती विभक्ती वापरून त्या विभक्तिप्रमाणे विग्रह करून समासाचा अर्थ सांगितला जातो. दुसऱ्या पदाचे जे लिंग असते, तेच सर्व समासाचे लिंग बनते. ज्या विभक्तीने दोन पदांमधील संबंध दर्शविला जातो त्या विभक्तीचे नाव त्या समासास दिले जाते. प्रथमा व संबोधन सोडून इतर सर्व विभक्ती हा संबंध दर्शवितात.

उदा.
बिइया (द्वितीया) त. – आसारूढो – आसं आरूढो। विरागसमावण्णो – विरागं समावण्णो।
तइया (तृतीया) त. – विणयसंपण्णो – विणएण संपण्णो। सुरवंदिओ – सुरेहिं वंदिओ।
पंचमी त. – चोरभयं – चोराओ भयं। संसारमुक्को – संसाराओ मुक्को
छट्ठी (चतुर्थी/षष्ठी) त. – रुक्खमूले – रुक्खस्स मूले। भोयणकालो – भोयणस्स कालो।
सत्तमी (सप्तमी) त. – वणवासो – वणे वासो। जुज्झणिउणो – जुज्झे णिउणो।

#### ब) कम्मधारय (कर्मधारय)

तत्पुरुष समासातील पूर्वपद आणि उत्तरपद एकाच विभक्तीत (प्रथमेत) असतील तर त्या समासाला **कर्मधारय** असे म्हणतात. कर्मधारय समासातील पदे सात प्रकारची असतात.

उदा.

| पहिले पद | दुसरे पद | उदाहरण |
| --- | --- | --- |
| विशेषण | विशेष्य | सीओदगं – सीअं उदगं। |
| | | सुहकम्माइं – सुहाइं कम्माइं। |
| विशेष्य | विशेषण | पुरिसोत्तमो – उत्तमो पुरिसो। |
| | | धम्माणुत्तरं – अणुत्तरं धम्मं। |
| विशेष्य | विशेषण | हिमधवलं – हिमं इव धवलं। |
| (विशेषणाला नामाची उपमा) | | समुद्दगंभीरो – समुद्दो इव गंभीरो। |
| विशेषण | विशेषण | सीउण्हं – सीअं च उण्हं च। |
| | | भुक्खिअतिसिआ– भुक्खिआ अ तिसिआ अ। |
| नाम | नाम | वडरुक्खो – वडो रुक्खो। |
| | | अहिंसाधम्मो – अहिंसा एव धम्मो। |
| अव्यय (उपसर्ग) | नाम | सुगुरू – साहू गुरू। |
| | | दुज्जणो – दुट्ठो जणो। |
| उपमेय | उपमान | चरणकमलं – चरणं कमलं इव। |
| | | मुहचंदो – मुहं चंदो इव। |

### क) नञ् तप्पुरिस (नञ् तत्पुरुष) –

ज्या तत्पुरुष समासातील प्रथम पद नकारार्थी असते त्याला **नञ् तत्पुरुष** असे म्हणतात. समासातील उत्तरपदाचे पहिले अक्षर स्वर असेल तर **'अण'** आणि उत्तरपदाचे पहिले अक्षर व्यंजन असेल तर **'अ'** ही नकारार्थी पूर्वपदे दिसतात.

उदा. अणलसो – ण अलसो ।　　　　अकज्जं – ण कज्जं।

### ड) उववय तप्पुरिस (उपपद तत्पुरुष) –

ज्या तत्पुरुष समासातील उत्तरपद हे क्रियापदाचे रूप असते त्या समासाला **उपपद तत्पुरुष** समास म्हणतात. हे क्रियापदाचे अवशिष्ट रूप स्वतंत्रपणे वाक्यात उपयोगात आणता येत नाही. समासाचा विग्रह करताना क्रियापदाच्या रूपापुढे 'त्ति' हे अव्यय जोडतात.

उदा. कुंभआरो – कुंभं करेइ त्ति।　　　　सुहदो – सुहं देइ त्ति।

### इ) दिगु (द्विगु) –

कर्मधारय समासातील प्रथम पद जर संख्याविशेषण असेल तर त्या समासाला **द्विगु** असे म्हणतात. द्विगु समास नेहमी एकवचनी असतो आणि या समासाने समूहाचे ज्ञान करून दिले जाते.

उदा. तिहुयणं – तिण्हं भुवणाणं समाहारो।　　　　दोमासं – दोण्हं मासाणं समाहारो।

### फ) अलुय–तप्पुरिस (अलुक् तत्पुरुष) –

खरेतर समास होताना दोन पदांमधील विभक्ति–प्रत्ययांचा लोप झाला पाहिजे. परंतु काही तत्पुरुष समासातील पहिल्या पदाचे विभक्ति–प्रत्यय सामासिक शब्दातही राहिलेले आढळतात. त्यास **अलुक्** (लोप न होणे) **तत्पुरुष** असे म्हणतात. काही समासातील उत्तरपद एखादे कृदन्त (क्रियापदाचे रूप) असते.

उदा. अंतेवासी – अंते वसइ।　　　　खेयरो – खे चरइ।

### ग) मज्झमपयलोवी (मध्यमपदलोपी) –

समासात असणाऱ्या दोन पदांमधील संबंध जोडणारे एक पद संपूर्णच गाळलेले असते. ते पद घेतल्याखेरीज समासाचा विग्रहच होऊ शकत नाही. अशा समासास मध्यमपदलोपी समास असे म्हणतात. ह्या समासातील पहिले पद

सामासिक असून त्या सामासिक पदाचे मध्यमपद लुप्त असते. लुप्तपद हे विशेषण असते.

उदा. चिंतामणी – चिंतापूरओ मणी। गंधतेल्लं – गंधमिस्सियं तेल्लं।

**३) बहुव्वीही (बहुव्रीही) – (अन्य पद प्रधान) –**

समासातील दोन्ही पदे गौण असून त्यातील पदाच्या अर्थाहून वेगळा असा तिसराच एखादा अर्थ सूचित केला जात असेल व संपूर्ण समास जर त्या शब्दाचे विशेषण असेल तर त्याला **बहुव्रीही समास** म्हणतात. बहुव्रीही समासात विशेषणे व नामे येतात. त्यांचा विग्रह करताना 'ज' या संबंधवाचक सर्वनामाचा उपयोग करावा लागतो व त्याच्या विभक्तीवरून बहुव्रीही समासाला त्या विभक्तीचे नाव दिले जाते. विभक्ति-तत्पुरुषाप्रमाणे विभक्ति-बहुव्रीहीचेही पांच प्रकार आहेत.

**अ) विभत्ति बहुव्वीही (विभक्ति – बहुव्रीही) –**

१. द्वितीया बहुव्रीही – पत्तगंगो – पत्तो गंगं जो सो।

२. तृतीया बहुव्रीही – जिइंदिओ – जियाणि इंदियाणि जेण सो।

३. पंचमी बहुव्रीही – गयराओ – गओ राओ जाओ सो।

४. चतुर्थी/षष्ठी बहुव्रीही – मंदपुण्णो – मंदं पुण्णं जस्स सो।

५. सप्तमी बहुव्रीही – बहुधणं – बहुं धणं जम्मि तं।

**ब) नञ् बहुव्वीही (नञ् बहुव्रीही) –**

ह्या बहुव्रीही समासांतील पहिले पद नकारात्मक असते. नञ् तत्पुरुषाहून हा समास भिन्न आहे कारण नञ् बहुव्रीहीला स्वतंत्र अर्थ नसून ते अन्य शब्दाचे विशेषण असते.

उदा. अणंतो – अविज्जमाणो अंतो जस्स सो। अपुत्तो – ण पुत्तो जस्स सो।

**क) सह बहुव्वीही (सह बहुव्रीही) –**

यातील पहिले पद 'स' किंवा 'सह' तर दुसरे पद नाम असते.

उदा. सवयंसो – वयंसेहिं सह। सहोयरो – समाणं उयरं जस्स सो।

**४) अव्वईभाव – (अव्ययीभाव) – (पूर्व-पद-प्रधान) –**

अव्ययीभाव समासातील पहिले पद बहुधा एखादे अव्यय असून उत्तर पद नाम असते. संपूर्ण समास हा अव्यय असून अंत्यस्वर दीर्घ असल्यास तो ऱ्हस्व होऊन त्यावर अनुस्वार असतो.

उदा. – अणुरूवं – रूवं अणु। (योग्यताअर्थाने) जावज्जीवं – जाव जीवो ताव।
अणुदिणं – दिणे दिणे। (क्रमशः या अर्थाने) जहासुहं – जहा सुहं तहा।
पइवरिसं – वरिसे वरिसे। पइदिणं – दिणे दिणे।

## अभ्यास

**१. पुढील समास ओळखा –**

१) जिणसासणं – जिणस्स सासणं।
२) चंदवअणा – चंदो इव वअणं जीसे सा।
३) दसदिणं – दसण्हं दिणाणं समाहारो।
४) अदीणो – ण दीणो ।
५) पाणिपायं – पाणिणो (पाणीओ) अ पाया अ।
६) देवदाणवा – देवा अ दाणवा अ।
७) वणयरो – वणे चरइ।
८) बंधमुक्को – बंधाओ मुक्को।
९) सहभिच्चो – भिच्चेण सह।
१०) णिद्दओ – णिग्गआ दया जाओ सो।

## ७) अव्यय

ज्या शब्दाच्या रूपांमध्ये काहीही बदल होत नाही त्याला **अव्यय** असे म्हणतात. जसा शब्द आहे तसाच अव्ययाचा वाक्यामध्ये प्रयोग केला जातो. अव्ययाला कोणतेही वचन अथवा विभक्ती लागत नाही. **काही अव्यये पुढीलप्रमाणे –** तं, आम, णवि, मिव, पिव, विव, व्व, व, विय, इव, जेण-तेण, णइ, चेअ, चिअ, च्चिअ, णवर, णवरि, अलाहि, अण, णाइं, माइं, हद्धि, वेव्व, मामि, हला-हले, हुं, हु-खु, थू, रे, अरे, ओ, अव्वो, अइ, वणे, मणे, अम्मो, अप्पणो, पाडिक्कं, पाडिएक्कं, उअ, इहरा, दर, इ, जे, र, पि, वि, अवि.

ह्या अव्ययांचे नियम पुढीलप्रमाणे –

१) **'तं'** हे अव्यय वाक्याच्या सुरुवातीला वापरले जाते. उदा. – तं तिअसबंदिमोक्खं ।

२) **'आम'** हे अव्यय 'स्वीकारणे, मान्य करणे, ठीक आहे' या अर्थाने वापरले जाते. उदा. – आम अहं भोअणं रंधेमि।

३) **'णवि'** हे अव्यय 'विपरीत' या अर्थाने वापरले जाते. उदा. – णवि हा वणे ।

४) **'मिव, पिव, विव, व्व, व, विअ, इव'** ही अव्यये उपमा दाखवण्यासाठी वापरली जातात. उदा. – कुमुअं मिव, चंदणं पिव, हंसो विव, सायरो व्व, खीरोओ व, कमलं विअ, भमरं इव.

५) **'जेण-तेण'** ही अव्यये लक्षण (अवस्था) दर्शवण्यासाठी वापरली जातात. उदा. – भमररुअं जेण कमलवणं। भमररुअं तेण कमलवणं।

६) **'णइ, चेअ / च्चेअ, चिअ / च्चिअ'** ही अव्यये 'निश्चय' या अर्थाने वापरली जातात. उदा. – गइए णइ, जं चेअ मउलणं लोअणाणं, अणुबद्धं तं चिअ कामिणी, ते च्चिअ धण्णा, ते च्चेअ सप्पुरिसा।

७) **'णवर'** हे अव्यय 'केवळ, मात्र, फक्त' या अर्थाने वापरले जाते. उदा. – णवर पिआइं चिअ णिव्वडंति।

७) **'णवरि'** हे अव्यय 'नंतर' या अर्थाने वापरले जाते. उदा. – णवरि अ से रहुवइणा ।

८) **'अलाहि'** हे अव्यय पुरे, या अर्थाने वापरले जाते. उदा. – अलाहि किं वाइएण लेहेण ?

९) **'अण, णाइं व माइं'** हे निषेध किंवा नाही या अर्थाने वापरले जातात. उदा. – अण चिंतिअममुणंती । णाइं करेमि रोसं । माइं काहीअ रोसं ।

१०) **'हद्धि, हद्धी'** हे अव्यय 'खेद किंवा मनस्ताप' या अर्थाने वापरले जाते. उदा.– हद्धि! हद्धी! इड्ढि ।

११) **'वेव्व, वेव्वे'** ही अव्यये 'आमंत्रण' या अर्थी वापरली जातात. उदा.वेव्व माले। वेव्वे सउंदले वहसि पाणिअं।

१२) **'मामि, हला, हले, सहि'** ही अव्यये मैत्रिणीला बोलावण्यासाठी वापरली जातात. उदा. मामि, सरिसक्खाणंपि। पणवह माणस्स हला । हले हयासस्स । सहि, एरिसिच्चिअ गइ ।

१३) **'हुं'** हे अव्यय दान, चौकशी व निवारण या अर्थी वापरले जाते. उदा. – हुं (दानार्थे) गिण्ह अप्पणो च्चिअ। हुं (चौकशी) साहसु सब्भावं । हुं (निवारण) णिल्लज्ज समोसर ।

१४) **'हु-खु'** ही अव्यये निश्चय, वितर्क, शक्यता व विस्मय / आश्चर्य अशा अर्थाने वापरली जातात. उदा. – निश्चय – तं पि हु अच्छिण्णसिरि । वितर्क – ण हु णवरं संगहिया । एअं खु हसइ । संशय – जलहरो खु धूमवडलो खु । शक्यता – तरिउं ण हु णवर इमं । विस्मय/आश्चर्य – को खु एसो सहस्ससिरो ।

१५) **'थू'** अव्ययाचा 'निंदा' या अर्थाने वापर केला जातो. उदा. – थू णिल्लज्जो लोओ ।

१६) **'रे, अरे'** ही अव्यये संभाषण सुरू करण्यासाठी वापरली जातात. उदा. – रे/अरे हिअअ मडह सरिआ। अरे मं समं मा करेसु उवहासं ।

१७) **'अव्वो'** हे अव्यय 'सूचना, दु:ख, संभाषण, खेद, अपराध, विस्मय, आनंद, आदर, भय, विषाद, पश्चात्ताप' या अर्थाने वापरले जाते. उदा. – अव्वो (सूचना) दुक्करकारय ।

१८) **'अइ'** हे अव्यय लक्ष वेधून घेण्यासाठी वापरले जाते. उदा. – अइ दिअर ! किं ण पेच्छसि ?
१९) **'अम्मो'** हे अव्यय 'आश्चर्य' या अर्थाने वापरले जाते. उदा. – अम्मो कह पारिज्जइ ?
२०) **'अप्पणो'** हे अव्यय 'स्वत:' या अर्थाने क्वचित वापरले जाते. उदा. – विसयं विअसंति अप्पणो कमलसरा।
२१) **'पाडिक्कं, पाडिएक्कं, पत्तेयं'** ही अव्यये 'प्रत्येक' अशा अर्थाने वापरली जातात.
२२) **'उअ'** हे अव्यय 'पहा' या अर्थाने कधीतरी वापरले जाते. उदा. – उअ लोआ गच्छंति ।
२३) **'इहरा'** हे अव्यय 'अन्यथा' या अर्थाने वापरले जाते. उदा. – इहरा णिसामण्णेहिं ।
२४) **'दर'** हे अव्यय 'अर्ध व अल्प' या अर्थाने वापरले जाते. उदा. – दर विअसिअं ।
२५) **'इ, जे, र'** ही तीन अव्यये 'पादपूरणासाठी' वापरली जातात.
२६) **'पि, वि, अवि, अपि'** ही अव्यये 'सुद्धा' या अर्थाने वापरली जातात.

## ८) संख्याविशेषणे

आपण गेल्या वर्षी १ – ३० पर्यंत संख्या पाहिल्या आहेत. आता या वर्षी आपण त्यापुढील संख्या पाहूया.

| | | |
|---|---|---|
| ३१ एयतीस, एअतीस | ५६ छवण्ण, छप्पण्ण | ८० असीइ |
| ३२ बत्तीस | ५७ सत्तावण्ण | ८१ एगासीइ, एकासीइ |
| ३३ तेत्तीस | ५८ अट्ठावण्ण | ८२ बासीइ, बाईसी |
| ३४ चोत्तीस, चउतीस | ५९ एगूणसट्ठि | ८३ तेसीइ, तेयासी |
| ३५ पणतीस | ६० सट्ठि | ८४ चोरासी, चउरासीइ |
| ३६ छत्तीस | ६१ एगट्ठि, एगसट्ठि | ८५ पंचासीइ |
| ३७ सत्ततीस | ६२ बासट्ठि, बावट्ठि | ८६ छलसीइ |
| ३८ अट्ठतीस | ६३ तेसट्ठि, तेवट्ठि | ८७ सत्तासीइ |
| ३९ एगूणचत्तालीस | ६४ चउसट्ठि, चउवट्ठि | ८८ अट्ठासीइ |
| ४० चत्तालीस | ६५ पणसट्ठि, पण्णट्ठि | ८९ एगूणणउइ |
| ४१ एगचत्तालीस, एकचत्तालीस | ६६ छावट्ठि, छासट्ठि | ९० णउइ |
| ४२ बायालीस | ६७ सत्तवट्ठि, सत्तसट्ठि | ९१ एक्कणउइ |
| ४३ तेयालीस | ६८ अट्ठसट्ठि, अढसट्ठि | ९२ बाणउइ, बेणउइ |
| ४४ चोयालीस | ६९ एगूणसत्तरि, अउणसत्तरि | ९४ चउणउइ |
| ४५ पणयालीस, पणयाल | ७० सत्तरि | ९५ पंचणउइ |
| ४६ छायालीस | ७१ एक्कसत्तरि, एगसत्तरि | ९६ छण्णउइ |
| ४७ सीयालीस, सत्तचत्तालीस | ७२ बावत्तरि | ९७ सत्तणउइ |
| ४८ अट्ठयालीस | ७३ तेवत्तरि | ९८ अट्ठाणउइ, अट्ठणउइ |
| ४९ एगूणपण्णास, एगूणपण्ण, अउणापण्ण | ७४ चोवत्तरि | ९९ णवणउइ |
| ५० पण्णास | ७५ पंचहत्तरि, पण्णत्तरि | १०० सय, सअअ |
| ५१ एक्कावण्ण, एगावण्ण | ७६ छावत्तरि | १००० सहस्स, सहस्सी |
| ५२ बावण्ण | ७७ सत्तहत्तरि | १०००० अयुत |
| ५३ तेवण्ण | ७८ अट्ठहत्तरि | १००००० सयसहस्स, सयसहस्सी, लक्ख |
| ५४ चउवण्ण | ७९ एगूणासीइ | १०००००० कोडी |
| ५५ पणवण्ण | | |

अकरा ते नव्याण्णवपर्यंत जे सामासिक संख्यावाचक शब्द तयार होतात, त्यासंबंधी खालीलप्रमाणे सर्वसाधारण नियम सांगता येतील :

१) दो चा दु किंवा बे किंवा बा होतो. जसे – दुवालस, बावण्ण, बेणउइ इत्यादी

२) ति चा ते होतो. जसे – तेरस, तेवीस, तेत्तीस इत्यादी

३) चउ चा चो होऊन पुढील व्यंजनाचे द्वित्व होते. जसे – चोद्दस, चोत्तीस इत्यादी

४) पंच चे पण किंवा पण्ण होते. जसे – पण्णरस, पणवीस इत्यादी

५) छ च्या पुढे स्वर आल्यास छ चे छल होते व व्यंजन आल्यास त्याचे द्वित्व होते. जसे – छलसीइ, छव्वीस इ.

६) सत्त तसाच राहतो. जसे – सत्तरस, सत्ततीस

७) अट्ठ चे अट्ठा होते किंवा अट्ठ तसाच राहतो. उदा. अट्ठारस, अट्ठावीस, अट्ठतीस, अट्ठचत्तालीस

८) णव तसाच राहतो. णवणउइ वगैरे.

काही संख्यावाचक शब्द संस्कृतप्रमाणे एकोण किंवा अउण प्रत्यय लावून तयार होतात.

एक या गणनावाचक विशेषणाची तिन्ही लिंगी रूपे स्वतंत्र होतात. दो, ति, चउ ही तिन्ही विशेषणे स्वतंत्रपणे चालतात. परंतु त्यांची रूपे तिन्ही लिंगी एकच असतात.

पाचपासून अठरापर्यंतची गणनावाचके पंचप्रमाणे चालतात व सर्व लिंगी त्यांची रूपे एकच असतात. मात्र एकोणीस पासून अठ्ठेचालीस पर्यंतची गणनावाचके पुल्लिंगी व नपुंसकलिंगी, इकारान्त अकारान्त व स्त्रीलिंगी आकारान्त नामाप्रमाणे चालतात.

एकोणपन्नास ते नव्याण्णव पर्यंतची गणनावाचके प्रथमेत व द्वितीयेत, नपुंसकलिंगी इकारान्त नामाप्रमाणे व इतर विभक्त्यांमध्ये ईकारांत नामाप्रमाणे चालतात.

लिंगाप्रमाणेच वचनाबाबतही गणनावाचकात एकवाक्यता नाही. एकवचन, अनेकवचन याचा शब्दशः अर्थ घेतल्यास 'एअ'/एक'/'एग' हे एकच गणनावाचक एकवचनी व त्याव्यतिरिक्त सर्व अनेकवचनी असावयास हवी. परंतु तसे होत नाही.

'एअ'/एक'/'एग' हे एकवचनी चालते.

दोन ते अठरापर्यंतची गणनावाचके जरी अनेकवचनी विशेष्यांची विशेषणे असली तरी त्यांची रूपे मात्र एकवचनीच असतात.

एकोणपन्नास ते अठ्ठावन्न पर्यंतची गणनावाचके अनेकवचनी चालतात.

एकोणसाठ (एकूणसट्ठि/एगूणसट्ठि/एऊणसट्ठि) ते नव्याण्णव पर्यंतची सर्व गणनावाचके अनेकवचनी विशेष्य असले तरी फक्त एकवचनी चालतात.

शंभरापासून कोटी पर्यंतची गणनावाचके अंत्यस्वरानुसार निरनिराळ्या प्रकारे उभयवचनी चालतात.

**पटवाचक :**

संख्यावाचकांना **खुत्तो, हा, सो,** हे प्रत्यय लावून पटवाचके होतात. उदा. दुखुत्तो (दोनदा), तिखुत्तो (तीनदा), अट्ठखुत्तो (आठदा/आठवेळा), चउहा (चारवेळा), सयसो (शंभर वेळा), सहस्ससो (हजार वेळा). मात्र एकदा या अर्थाचे सइं असे रूप होते.

**आवृत्तीवाचक :**

संख्यावाचकांना 'विह' प्रत्यय लावला म्हणजे आवृत्तीवाचके तयार होतात. काही वेळा 'हा' प्रत्यय लागतो. उदा. एअविह/एकविह/एगविह, दुविह, तिविह, चउविह, अट्ठहा, सयहा, सहस्सहा.

**अपूर्णांकात्मक :**

जो अपूर्णांक हवा असेल त्याच्या पुढील पूर्णांकाच्या पूर्वी अपूर्णांकात्मक शब्द जोडला म्हणजे अपूर्णांकात्मक विशेषण तयार होते. उदा. अद्धट्ठम (साडेसात), अद्धपंचम (साडेचार), अद्धबारस (साडे अकरा) इ. मराठीमध्ये अपूर्णांकवाचक शब्द आधी येतो. परंतु पुढील पूर्णांक न घेता मागील पूर्णांक घेतला जातो. उदा. साडेआठ म्हणजे ८ + १/२, परंतु महाराष्ट्री प्राकृतात अद्धट्ठम मराठीत साडेआठ, पण याचा अर्थ ८ अधिक अर्धा =८ - १/२ तर महाराष्ट्री प्राकृतात ८ वजा अर्धा = म्हणजे ८ - १/२ = ७-१/२. काही वेळा अपूर्णांकवाचक शब्द नंतरही येतो. उदा. दिड्ढ, दिअड्ढ = १-१/२.

उदाहरणार्थ खालील गाथांमध्ये जैनधर्मविषयक काही कल्पना व्यक्त करणारी पदे आली आहेत. या उदाहरणातून आपणास संख्याविशेषण व विशेष्याची लिंग, वचन व विभक्ती एकच असते हे कळते.

एगा सत्ता दुविहो णओ य कालत्तयं गइचउक्कं।
पंचेव अत्थिकाया दव्वछक्कं च सत्त-णया।।
अट्ठेव य कम्माइं णव-तत्ताइं दसविहो धम्मो।
एगारस-पडिमाओ बारस-वयाइं गिहीणं च।।
वरगामाण सहस्सं सयं गइंदाणं विउलभंडारं।
पाइक्काणं लक्खं तुरयाणं दससहस्साइं।।

**सत्ता –** (**सत्** तत्त्व) - आत्म्याचे अस्तित्व.

**णअ/णय –** कोणत्याही वस्तूचे ती वस्तू जाणून घेणाऱ्यास होणारे अंशात्मक ज्ञान.
त्याचे मुख्य प्रकार दोन : (१) द्रव्यार्थिक नय, (२) पर्यायार्थिक नय.

**कालत्तय –** तीन काळ : (१) वर्तमानकाळ, (२) भूतकाळ, (३) भविष्यकाळ.

**गइचउक्कं –** आत्म्यास त्याच्या कर्मानुसार प्राप्त होणाऱ्या चार प्रकारच्या स्थिती किंवा गती : (१) नरकगती, (२) तिर्यक् (पशुपक्ष्याची) गती, (३) मनुष्यगती, (४) देवगती.

**अत्थिकाय –** विश्व व्यापून राहणाऱ्या पाच प्रकारच्या गोष्टी : (१) जीव, (२) अजीव, (३) धर्म, (४) अधर्म, (५) आकाश.

**दव्वछक्कं –** सहा प्रकारची द्रव्ये : (१) जीव, (२) अजीव, (३) धर्म, (४) अधर्म, (५) आकाश आणि (६) काल.

**सत्तणय –** नयाचे सात उपप्रकार : (१) नैगम, (२) संग्रह, (३) व्यवहार, (४) ऋजुसूत्र, (५) शब्द, (६) समभिरूढ, (७) एवंभूत.

**अट्ठकम्म –** आठ प्रकारची कर्मे : (१) ज्ञानावरणीय, (२) दर्शनावरणीय, (३) वेदनीय, (४) मोहनीय, (५) आयु, (६) नाम, (७) गोत्र, (८) अंतराय.

**णवतत्त –** नऊ तत्त्वे : (१) जीव, (२) अजीव, (३) आस्रव, (४) पुण्य, (५) पाप, (६) बंध, (७) संवर, (८) निर्जरा, (९) मोक्ष.

**दसविहो धम्मो –** दहा प्रकारचा धर्म : (१) क्षमा, (२) मार्दव, (३) आर्जव, (४) सत्य, (५) शौच, (६) संयम-इंद्रिय दमन, (७) तप, (८) त्याग, (९) अकिंचन, (१०) ब्रह्मचर्य.

**एआरस/एगारस पडिमाओ –** अकरा प्रकारच्या प्रतिमा- आत्मोन्नतीच्या अवस्था : (१) दर्शन, (२) व्रत, (३) सामायिक, (४) पोषध, प्रोषध (५) नियम, (६) ब्रह्मचर्य, (७) सचित्तत्याग, (८) आरंभत्याग, (९) प्रेष्यारंभत्याग, (१०) उद्दिष्टत्याग, (११) श्रमणभूत.

**बारसवयाइं –** बारा प्रकारची व्रते : (१) अहिंसा, (२) सत्य, (३) अचौर्य, (४) ब्रह्मचर्य, (५) अपरिग्रह, (६) दिग्व्रत, (७) देशावकाशिक, (८) अनर्थदंडत्याग, (९) भोगोपभोगपरिमाण, (१०) सामायिक, (११) प्रोषधोपवास, (१२) अतिथिसंविभाग.

## अभ्यास

**१. पुढील अंक महाराष्ट्री प्राकृतमध्ये (अक्षरामध्ये) लिहा.**

४, ११, १२, १५, १९, ३३, ३६, ४०, ४७, ५६, ६२, ७४, ७९, ८४, ९३, ९९

**२. मराठीत भाषांतर करा.**

१) एको बुद्धिमंतो अमच्चपुत्तो अत्थि।

२) वाणारसीए णअरीए दो विप्पा भाअरो।

३) चत्तारि गोपालदारआ वणं गच्छंति।

४) अट्ठ विज्जाहर-धूयाओ दिट्ठाओ।

५) कुमारो चउद्दस-विज्जाओ गेण्हइ।

६) दसमे दिणे बालअस्स मेहो त्ति णामं कअं।

७) चउत्थो वरो तत्थेव ठिओ।

८) हत्थे पंचंगुलिआओ संति।